# हवामान आधारित कृषि सल्ला

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र , मोहोळ , सोलापूर.

दूरध्वनी –(०२१८९) २३३००१ ईमेल-damu.kvkmohol@gmail.com

### (३६६) हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दिनांक ०१/१२/२०२३

| मागील आठवडयातील हवामान (दि २५.११.२०२३ ते ०१.१२.२०२३) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (दि.०२.१२.२०२३ ते ०६.१२.२०२३) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ०१ | दिनांक | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ७२.४ | ०.० | -- | पाऊस (मि. मी.) | १२.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० |
| ३३.२ | ३३.७ | ३३.३ | ३३.४ | ३३.० | २९.७ | -- | कमाल तापमान (अं. से.) | ३२ | ३३ | ३३ | ३३ | ३२ |
| २२.२ | २१.६ | २२.५ | २२.६ | २०.० | १९.९ | -- | किमान तापमान (अं. से.) | २० | १८ | १७ | १६ | १६ |
| अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | -- | ढग स्थिति (आकाश ) | ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ |
| ९० | ८७ | ८९ | ९० | ९० | ९१ | -- | सकाळची सापेक्ष आद्रता (%) | ७० | ६४ | ६२ | ७१ | ७० |
| ५८ | ५६ | ६१ | ५९ | ६२ | -- | -- | दुपारची सापेक्ष आद्रता (%) | ५४ | ३४ | ३४ | ३९ | ३७ |
| ३.७ | ३.७ | ३.७ | ३.७ | ३.७ | ४.२ | -- | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १० | १२ | १६ | १८ | १४ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | **भारत हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचे कडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सोलापूर जिल्ह्यामध्ये दिनांक ०१ डिसेंबर ते ०६ डिसेंबर २०२३ दरम्यान आकाश अंशतः ढगाळ राहील. दिनांक ०१ आणि ०२ नोव्हेंबर २०२३, रोजी तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. तर दिनांक ०३ डिसेंबर ते ०६ डिसेंबर २०२३, दरम्यान हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे.**<br>कमाल तापमान ३२ अंश सेल्सिअस ते ३३ अंश सेल्सिअस पर्यंत तर किमान तापमान १६ ते २० अंश सेल्सिअस पर्यंत राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ६२ ते ७१ % तर दुपारची सापेक्ष आद्रता ३४ ते ५४ % दरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी १०.० किमी ते १८.० किमी पर्यन्त राहण्याची शक्यता आहे.<br>**ईशारा : भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार सोलापूर जिल्ह्यात दिनांक ०१ डिसेंबर २०२३ रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांच्या कडकडाट, सोसाट्याच्या वाऱ्यासह (वाऱ्याचा वेग ताशी ३० ते ४० कि.मी./तास) हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे.** |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारीत अंदाजानुसार (ईआरएफएस )मध्य महाराष्ट्रात विभागात (सोलापूर,धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर)<br>**दिनांक ०६ डिसेंबर ते १२ डिसेंबर २०२३ दरम्यान**<br>पाऊस सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>कमाल तापमान सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>किमान तापमान सरासरी राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ➢ तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी स्वतःची तसेच आपल्या जनावरांची काळजी घ्यावी व जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत.<br>➢ पावसाची शक्यता असल्याने उशिरा लागवड झालेल्या पक्व खरीप मका पिकाची त्वरित काढणी करावी व काढणी केलेल्या शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.<br>➢ पावसाचे उघडीप पाहून व वारा शांत असताना पिकांवर किटकनाशक व बुरशीनाशकाची फवारणी करावी.<br>➢ शेतकरी बांधवांनी आपल्या पिकांचे किड व रोगसंदर्भात नियमित सर्वेक्षण करून जर प्रादुर्भाव आर्थिक नुसकान पातळीच्या वर आसल्यास योग्य उपाययोजना कराव्यात.<br>➢ हवामान अंदाजावर आधारित कृषिसल्ला व हवामानाच्या पूर्वानुमानाकरिता मेघदूत या मोबाइल ॲपचा वापर करावा. विजेच्या अंदाजाच्या पूर्वानुमानाकरिता दामिनी मोबाइल ॲपचा वापर करावा.<br>➢ **शेतकरी बांधवांनी मेघ गर्जना व वीजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्याने पुढील प्रमाणे काळजी घ्यावी.** |

# हवामान आधारित कृषि सल्ला
## ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र,
## कृषि विज्ञान केंद्र , मोहोळ , सोलापूर.

**दूरध्वनी** –(०२१८९) २३३००१ **ईमेल**-damu.kvkmohol@gmail.com

| | | |
|---|---|---|
| | | ➢ मेघ गर्जना व वीजांचा कडकडाट वादळीवारा ची शक्यता असल्याने नवीन लागवड केलेल्या फळबागांना तसेच भाजीपाला पिकांना जोरदार वाऱ्याची शक्यता असल्याने नवीन लागवड केलेल्या फळबागांना तसेच भाजीपाला पिकांना जोरदार वाऱ्यामुळे झाडे पडू नये म्हणून काठी/ बांबू च्या सहहयाने आधार द्यावा.<br>➢ शेती मध्ये काम करत असल्यास त्वरित सुरक्षित ठिकाणी जावे. झाडाखाली थांबणे टाळावे.<br>➢ जनावरे तलाव नदी किंवा इतर पाण्याच्या ठिकाणी असतील तर त्वरित बाहेर काढून सुरक्षित ठिकाणी ठेवावे.<br>➢ जनावरे ट्रॅक्टर किंवा इतर धातूंच्या वस्तूंपासून लांब बांधावीत. |
| **संदेश** | | ➢ तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी स्वतःची तसेच आपल्या जनावरांची काळजी घ्यावी व जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत. |
| **तूर** | **शेंगा भरण्याची अवस्था** | सध्याच्या ढगाळ हवामानामुळे शेंगा पोखरणाऱ्या माशीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास शेंगा पोखरणाऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी २० मिली प्रोफेनोफॉस ५० % प्रवाही प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वछ वातावरणात फवारणी करावी. |
| **मका** | **काढणी** | पावसाची शक्यता असल्याने उशिरा पेरणी झालेल्या पक्व खरीप मका पिकाची त्वरित काढणी करावी व काढणी केलेल्या शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी .त्वरित मळणी करणे शक्य नसल्यास काढलेली कणसे पॉलीथिनच्या पेपरने झाकून घ्यावीत.<br>मका काढणी नंतर मका वैरण सुरक्षित ठिकाणी ठेवावा सुरक्षित ठिकाणी ठेवणे शक्य नसल्यास .मका वैरण पॉलीथिनच्या पेपरने झाकून ठेवावी. |
| **रब्बी ज्वारी** | **वाढीची अवस्था** | रब्बी ज्वारी पिकावर अमेरिकन लष्करी अळीचा १० % पेक्षा जास्त प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी स्पिनेटोराम ११.७% एस. सी. ५ मिली किंवा थायमेथाक्झॉम १२.६ % + लॅमडासायहॅलोथ्रीन ९.५ % झेड. सी. २.५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वछ वातावरणात फवारणी करावी. |
| **हरभरा** | **जिरायत हरभरा फुलोरा अवस्था** | सध्याच्या ढगाळ व दमट हवामानामुळे पिकावर फुलकळी लागण्याच्या वेळेस बारीक आळ्या दिसून आल्यास व पानावरती पांढरे डाग दिसताच निंबोळी अर्काची फवारणी करावी.<br>हरभरा पिकात किडीच्या सर्वेक्षणासाठी हेक्टरी ५ कामगंध सापळे लावावेत. किडीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची पहिली फवारणी करावी. |
| **करडई** | **वाढीची अवस्था** | सध्याच्या ढगाळ व दमट हवामानामुळे करडई पिकावर मावा किडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. करडई पिकावरील मावा आणि पाने खाणारी अळी यांच्या एकत्रित नियंत्रणासाठी ॲसिफेट १६ ग्रॅम + फेनवलरेट १० मिली प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात स्वछ वातावरणात फवारणी करावी. |
| **ऊस** | **खोडवा ऊस व्यवस्थापन** | **खोडवा ऊस व्यवस्थापन:** उसाचे बुडखे मोठे राहिल्यास ते जमिनीलगत धारदार कोयत्याने छाटून घ्यावेत. त्यामुळे जमिनी खालील कोंब फुटण्यास वाव मिळतो व फूटव्यांची एकूण संख्या वाढते. बुडख्यांच्या छाटणी नंतर लगेचच ०.१ टक्के बाविस्टीन ( १ ग्रॅम बाविस्टीन १ लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणाची) या बुरशीनाशकाची फवारणी करावी. त्यामुळे मातीतून होणाऱ्या बुरशीजन्य रोगांचा प्रतिबंध होतो. शेतात सरीमध्ये ठेवलेल्या पाचटावर प्रति हेक्टारी ८० किलो युरिया व १०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट टाकावे. त्यानंतर १० किलो पाचट कुजविणारे जिवाणू संवर्धन सेंद्रिय खतामध्ये अथवा ओलसर मातीमध्ये मिसळून समप्रमाणात पाचटावर पसरून टाकावे. पाचट कुजण्यासाठी नत्र, स्फुरद आणि पाचट कुजविणारे जिवाणू यांची गरज असते. |
| **कांदा** | **वाढीची अवस्था** | सध्याचा ढगाळ , दमट हवामान व तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याने कांदा पिकावरील फूलकिडे या किडीचा तसेच करपा हा रोग आढळून आल्यास डायमीथोएट ३० ईसी. १५ मिली किंवा लॅम्ब्डासायहॅलोथ्रीन ५ % ईसी ६ मिली + टेब्युकोनॅझोल १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ वातावरणात फवारणी करावी.<br>पावसाची शक्यता असल्याने परिपक्व झालेला कांदा त्वरित काढणी करून घ्यावा. तसेच कापणी केलेला कांदा शेडमध्ये ठेवावा किंवा प्लॅस्टिक च्या कागदाने झाकून ठेवावीत. |
| **केळी** | | सध्याचा ढगाळ , दमट हवामान व तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याने केळी पिकावर करपा (सिगटोका) रोग आढळून आल्यास रोगाच्या नियंत्रणासाठी रोगग्रस्त पानाचा भाग / पाने काढून जळावीत. रोगाची लक्षणे दिसताच प्रोपीकोन्याझोल ५ मिली व मिनरल ऑइल १०० मिली प्रती १० लीटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. त्यानंतर २० दिवसांच्या अंतराने २ फवारण्या कराव्यात. सोसाट्याच्या वाऱ्याची शक्यता असल्याने झाडे पडू म्हणून वजनाने मोठ्या असलेल्या घडास गरजेप्रमाणे बांबूच्या किंवा पॉलीप्रोपेलीनच्या पट्ट्यांच्या सहहयाने झाडांना/ घडाना आधार/ टेकू द्यावा. |
| **द्राक्ष** | | **फुलोरा अवस्थेतील द्राक्षबाग:** या द्राक्षबागांमध्ये पावसाची शक्यता असल्याने घड कुजण्याची आणि बुरशीच्या संसर्गाची समस्या गंभीर बनू शकते. त्यामुळे, गाढ नसलेल्या अतिरिक्त फुटी ताबडतोब काढून टाकल्यास कॅनोपी मधील आर्द्रता कमी होण्यास मदत होईल. फुटी काढून टाकल्यानंतर लगेच, पुढील संसर्ग टाळण्यासाठी कॉपर बेस बुरशीनाशकाची फवारणी करावी. झिंक, बोरॉन आणि पोटॅशियमची फवारणी केल्यास वेल मजबूत होईल.<br>सध्याचा ढगाळ , दमट हवामान व तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याने द्राक्ष पिकावर केवडा (डाउनी |

**दूरध्वनी –(०२१८९) २३३००१** **ईमेल**-damu.kvkmohol@gmail.com

| | | |
|---|---|---|
| | | मिल्ड्यू ) रोग आढळून आल्यास रोगाच्या नियंत्रणासाठी अमिसुल्ब्रोम @ ०.३७५ ग्रॅम / एल + मॅन्कोझेब ७५डब्ल्यूपी @ ०२ ग्रॅम / लिटर (टँक-मिक्स) किंवा डायमेथोमॉर्फ @ ०१ ग्रॅम / लिटर + मॅन्कोझेब ७५डब्ल्यूपी @ २ ग्रॅम / लिटर (टँक- मिक्स) किंवा इप्रोव्हॅलिकार्ब + प्रोपिनब @ २.२५ ग्रॅम / लिटर किंवा मंडीप्रोपमीड @ ०.८ ग्रॅम / लिटर सारख्या प्रणालीगत बुरशीनाशकांच्या केवडा बुरशी नियंत्रण केले जाऊ शकते. |
| **डाळिंब** | | सध्याचा ढगाळ हवामान व पाऊस असल्याने डाळिंब पिकावर तेलकट डाग रोग आढळून आल्यास तेलकट डाग रोगाच्या व्यवस्थापनासाठी ब्रोनोपॉल (९५ – ९८%) ०.५ ग्रॅम प्रती लिटर पाणी + कॉपर ऑक्सीक्लोराईड २ ते २.५ ग्रॅम प्रती लिटर पाणी + स्प्रेडर स्टिकर ०.५ मिली प्रती लिटर पाणी याप्रमाणात पाऊस पडल्यानंतर २४ तासांच्या आत फवारणी करावी. |
| **जनावरांचे व्यवस्थापन** | | तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी स्वतःची तसेच आपल्या जनावरांची काळजी घ्यावी व जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत.<br>सर्व जनावरांना चपटे कृमि (लिव्हर फ्लयूक) रोग प्रतिबंधक उपाय म्हणून पशुवैद्यकाच्या सहाय्याने योग्य वेळी लसीकरण करून घ्यावे. जनावरांना पोटातील जंत यांच्या नियंत्रणासाठी पशुवैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक पाजावे तसेच जनावरांना व पक्षांना नेहमी पिण्यासाठी स्वच्छ व थंड पाणी द्यावे. |

**स्त्रोत :**
**१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.**
**२) मागील हवामान :विभागीय कृषि संशोधन केंद्र, सोलापूर.**
**ठिकाण :कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ, सोलापूर.**
**दिनांक : ०१ डिसेंबर २०२३**

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्रामीण कृषि मौसम सेवा-जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ, सोलापूर.**